॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com


*** सुविचार ***
सौम्य शब्दांनी कठोर हृदयं देखील जिंकता येतात.





■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. ३० मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ४६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### रशियाकडून तिसऱ्या महायुद्धाची अमेरिकेला धमकी

**● नवी दिल्ली –** रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे युक्रेनशी युद्ध सुरू ठेवून आगीशी खेळत आहेत, अशी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली प्रखर टीका रशियाच्या जिव्हारी लागली आहे. या प्रकारानंतर रशियाचे माजी अध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांनी तिसऱ्या महायुद्धाचा इशारा दिला आहे. युक्रेनमध्ये क्षेपणास्त्रे व ड्रोन हल्ल्यानंतर अनेकांचा मृत्यू झाला. त्यामुळे रशियावर अमेरिका नव्याने बंदी लादण्याचा विचार करीत आहे असे ट्रम्प यांनी म्हटले होते. त्यानंतर हा इशारा आला आहे. रशिया आगीशी खेळत आहे आणि ही खरोखरच वाईट गोष्ट आहे, असे ट्रम्प म्हणाले होते. त्यावर मेदवेदेव यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, मला फक्त एकच वाईट गोष्ट माहिती आहे आणि ती म्हणजे तिसरे महायुद्ध. रशियाबरोबरच्या युद्धात आपल्याला आणखी लष्करी मदत मिळावी, यासाठी युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी बर्लिनला भेट दिली आहे. नवीन जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांची त्यांनी भेट घेत चर्चा केली. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली युद्ध समाप्त करण्याच्या प्रयत्नांना न जुमानता त्यांनी पाऊल उचलले. जर्मनी हा अमेरिकेनंतर युक्रेनला लष्करी मदत देणारा सर्वांत मोठा दुसरा देश आहे.

### मस्क यांनी राष्ट्राध्यक्षांचे सल्लागार पद सोडले

**● नवी दिल्ली –** डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून अमेरिकेच्या आर्थिक सुधारणेसाठी उलटसुलट निर्णय घेणारे, ट्रम्प यांच्या खास डॉज समितीचे अध्यक्ष अब्जाधीश एलन मस्क यांनी अचानक आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. ट्रम्प यांच्या सल्लागाराचे पद सोडत असल्याचे मस्क यांनी जाहीर केले आहे. मस्क यांच्या कसेही निर्णय घेण्यामुळे लाखो अमेरिकन लोकांना नोक-या गमवाव्या लागल्या होत्या. तसेच टेरिफ वॉर असेल किंवा अन्य काही निर्णय यात मस्क यांचा वाटा जास्त होता. यामुळे अमेरिकन लोकांमध्ये मस्क यांच्याविरोधात तीव्र नाराजी होती. मस्क यांच्या कंपनीच्या कारची विक्री मंदावली होती, तसेच ज्या लोकांनी गाड्या घेतल्या आहेत त्यांच्या गाड्यांना संतापलेले लोक नुकसान करत होते. यामुळे या मालकांना आम्ही मस्क यांचे डोके ठिकाणावर होते, तेव्हा गाडी घेतलेली असे स्टीकर लावावे लागत होते.

# ऑपरेशन सिंदूर अजून संपले नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पाकला थेट इशारा

**● नवी दिल्ली I वीरभूमी–** पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा घुसून हल्ला केला आहे. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही असा कडक इशारा पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी गुरुवार दि. २९ मे रोजी पश्चिम बंगालमधील अलीपुरद्वार येथे दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथील कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी केली. यावेळी जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी पाकिस्तानला थेट इशारा दिला. पंतप्रधान मोदी म्हणाले की २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर कृत्यानंतर देशभरात खूप संताप होता. आमच्या माता-बहिणींचे सिंदूर पुसण्याचे धाडस केले. पण, आपल्या सैन्याने त्यांना सिंदूरची ताकद दाखवून दिली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने जगाला सांगितले की, जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर शत्रूला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा त्यांच्या घरात घुसून हल्ला केला आहे. आम्ही शक्तीची पूजा करतो.



आम्ही दहशतवादाचे अड्डे नष्ट केले, ज्याची पाकिस्तानने कल्पनाही केली नव्हती. पाकिस्तानकडे दहशतवादाशिवाय काहीही नाही. पाकिस्तानने फक्त दहशतवादाला पोसले आहे. जेव्हा थेट युद्ध होते, तेव्हा पाकिस्तानचा पराभव निश्चित असतो. हेच कारण आहे की पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांची मदत घेते अशी टीका पंतप्रधानांनी केली.

आज जेव्हा भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे, तेव्हा बंगालचा सहभाग अपेक्षित आणि आवश्यक आहे. या उद्देशाने, केंद्र सरकार येथे पायाभूत सुविधा, नवोपक्रम आणि गुंतवणुकीला सतत नवीन चालना देत आहे. बंगालचा विकास हा भारताच्या भविष्याचा पाया आहे. आज त्या पायावर आणखी एक मजबूत वीट जोडण्याचा दिवस आहे अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

### हा राष्ट्रीय विजय, यात सर्वांचे योगदान : एअर चीफ मार्शल

■ पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला ज्या पद्धतीने प्रत्युत्तर दिले, त्याची जगभरात चर्चा होत आहे. भारतीय सैन्याचे पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे प्रमुख तळ कशाप्रकारे उद्ध्वस्त केले, हे साऱ्या जगाने पाहिले. भारतीय हवाई दलाचे एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल मोठे विधान केले आहे. सीआयआय वार्षिक व्यवसाय शिखर परिषद २०२५ ला संबोधित करताना एपी सिंग म्हणाले, ऑपरेशन सिंदूर एक राष्ट्रीय विजय आहे.

# घरात पाणी गेलेल्या नागरिकांना दहा हजार रुपयांची मदत

**● बारामती I वीरभूमी–** रविवारी (दि. २५) बारामती शहर आणि परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. त्याच दिवशी उपमुख्यमंत्री अजित पवार सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करीत बारामतीत पोहोचले. ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरून नुकसान झाले आहे, त्यांना दहा हजार रुपयांची मदत केली जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्याची पाहणी करून पंचनामे सुरू असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून बारामती परिसरात अतिवृष्टीने थैमान घातले आहे. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच पिंपळी परिसरात नीरा डावा कालवा फुटल्याने अनेक नागरिकांच्या घरात व शेतात पाणी जाऊन अनेकांचे संसार उघड्यावर आले. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या चार दिवसांत गुरुवारी दुसरा पाहणी दौरा करीत नुकसानीची माहिती घेतली.

सोमवारी (दि. २६) दिवसभर पवार यांनी बारामती शहर, तालुक्यासह इंदापूर तालुक्याचा पाहणी दौरा करीत नुकसानीची माहिती घेतली. त्यानंतर दोन दिवसांनी पुन्हा उपमुख्यमंत्री पवार यांनी गुरुवारी (दि. २९) पाहणी दौरा केला. बारामती तालुक्यातील नुकसानग्रस्त गावांची पाहणी केली. यादरम्यान पवारांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व अधिकाऱ्यांना तोडगा काढण्याच्या सूचना दिल्या. तसेच शेतकऱ्यांसमवेत संवाद साधला.

यावेळी पवार यांनी, पंचनामे उरकले का? धान्य देण्यास सुरुवात झाली आहे, धान्य मिळाले का? असा सवाल करीत शासनाच्या उपाययोजनांबाबत माहिती देत शेतकऱ्यांना आश्वस्त केले. पवार म्हणाले, ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरून नुकसान झाले आहे, त्यांना दहा हजार रुपयांची मदत केली जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्याची पाहणी करून पंचनामे सुरू आहेत.

# आरसीबीची चौथ्यांदा अंतिम फेरीत धडक




**● मुंबई I वीरभूमी–** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने आयपीएलच्या १८ व्या मोसमातील क्वालिफायर १ मध्ये पंजाब किंग्सवर एकतर्फी विजय मिळवत फायनलमध्ये धडक दिली आहे. महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये झालेल्या सामन्यात आरसीबीने पंजाबसमोर १०२ धावांचे माफक आव्हान ठेवले होते.

आरसीबीने हे आव्हान १ विकेटच्या मोबदल्यात १० ओव्हरमध्ये पूर्ण केले आणि पहिल्याच झटक्यात फायनलचे तिकीट मिळवले. आरसीबीने १० ओव्हरमध्ये १०६ रन्स केल्या. यासह आरसीबीची ही आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात अंतिम फेरीत पोहचण्याची चौथी तर २०१६ नंतरची पहिली वेळ ठरली. तर दुसऱ्या बाजूला पंजाबला या पराभवानंतरही अंतिम फेरीत पोहचण्यासाठी आणखी एक संधी मिळणार आहे.

# पंढरपुर आषाढी वारीच्या मार्गात व्हिआयपी ताफ्यांना नो एन्ट्री; सरकारचा निर्णय

**● मुंबई I वीरभूमी–** पंढरपुरच्या विठुरायाला भेटण्याचे वेध वारकऱ्यांना लागले आहेत. दरवर्षी लाखो लोक पायी वारी करतात. वारीला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्याचसोबत शेकडो वर्षांची परंपरादेखील आहे. अनेकदा वारीला जाताना वारकऱ्यांना काही कारणामुळे त्रास सहन करावा लागतो. व्हिआयपी वाहनांचे ताफे जात असतात. त्यामुळे वारकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. आता त्याच पार्श्वभूमीवर शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. शासनाने व्हिआयपी वाहनांना नो एन्ट्री केली आहे.

यंदा वारी २६ जून ते १६ जुलै या कालावधीत होणार आहे. आषाढी वारीसाठी वारकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यामध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

या बैठकीत घेण्यात आलेला महत्त्वाचा निर्णय म्हणजे वारीच्या मार्गात व्हिआयपी गाड्यांना नो एन्ट्री. अनेकदा व्हिआयपी वाहनांचा ताफा जातो त्यामुळे वारकऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. यामुळे हा निर्णय घेतला आहे.

यंदा वारीसाठी जाणाऱ्या लोकांना टोलमध्ये सवलत, मानाच्या पालख्या, वारकऱ्यांना फिरती शौचालये, पाणी, मेडिकल सुविधा आणि पोलिस बंदोबस्तासाठी नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी पाण्याची सोय, विजेची जोडणी, तंबू उपलब्ध करून देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. यंदा वाखरी येथे मॉडेल वारीतळ विकसित केले जाणार आहे. रेल्वेच्या ६५ एकर जागेचा यासाठी समावेश केला आहे. यामुळे वारकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. याचसोबत अनेक ठिकाणी स्वागत मंडप टाकण्यात येणार आहे. लाउड स्पीकरवर बंदी घातली आहे. पालखीसोबत अनेक ॲम्ब्युलन्स, दर्शन पास, पाण्याची सोय, औषधांची व्यवस्था, शौचालये उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहे. वारकऱ्यांना वारीत काहीही त्रास होऊ नये, याची काळजी घेतली जाणार आहे.

# पोलिस कॉन्स्टेबलने लावली वाहतुकीला शिस्त

## पाथर्डी शहरात वाहतूक कोंडीची समस्या I वाहन चालकांना शिस्त लावण्याचा पोलिसांचा प्रयत्न

**● पाथर्डी I वीरभूमी–** पाथर्डीशहरातून जाणाऱ्या विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, बारामती राज्य मार्ग, प्रसिद्ध देवस्थाने यामुळे शहरातील नाईक चौक व कोरडगाव चौकात वाहतूक कोंडीची समस्या कायमचीच व त्यात भर पडली ती लग्न सराई, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांची यामुळे हजारो वाहनाची गर्दी वाढलेली. यामुळे प्रवासी भाविक व वाहन चालक तासनतास अडकून पडतात मात्र या गंभीर परिस्थितीत पाथर्डी पोलीस स्टेशनला नव्याने रुजू झालेले व हायवे पोलीस दलाचा दांडगा अनुभव असलेले वाहतूक पोलीस कर्मचारी मधुकर कोकाटे व पोलिस कॉन्स्टेबल अल्ताफ शेख यांनी वाहतुकीस शिस्त लावत आपली कामगिरी चोख बजावत व वेळप्रसंगी भर पावसात ही कर्तव्य बजावत असल्याने त्यांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

बेशिस्त वाहन पार्किंग, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी, चालक परवाना तपासणी, बिगर नंबर वाहन, वाहतूक नियम न पाळणे या विरोधात मोहीम राबवुन तसेच याबाबत दंड वसुली मोहीम राबविल्याने शहरातील बेशिस्त वाहतूक व पार्किंगला आळा बसला आहे व वाहतूक ही सुरळीत झाली आहे. यासाठी पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष लांडगे व पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे व इतर कर्मचारी यांचे ही मार्गदर्शन व सहकार्य या कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांना मिळत आहे. या महिन्यात तर मुसळधार पाऊस, सुट्टीमुळे वाढलेली वाहतूक, बेशिस्त वाहन पार्किंग, जुने बस स्थानकाचा बदलेला मार्ग, लग्नाच्या मिरवणूक व इतर समारंभ यांमुळे राष्ट्रीय महामार्गावर ट्रॅफिक जामचा प्रश्न नित्याचाच व गंभीर बनला होता. अशा वेळी कमी मनुष्यबळ असतानाही पोलिसांनी अथक परिश्रम घेत दररोज आपली कामगिरी चोख बजावत वाहतूक सुरळीत करत वाहतूक कोंडी होऊ दिली नाही. या कर्तव्यदक्ष कामगिरीबद्दल स्थानिक नागरिकांनी पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले असून, 'खऱ्या अर्थाने हे पोलिसांचे कार्य वाखाणण्याजोगे आणि प्रेरणादायी आहे, अशीच कामगिरी नियमित बजवावी असे गौरवोद्गार काढले.



# रविवारी नाशिक येथील कुंभमेळा तयारीचा शंखनाद

**● नाशिक I वीरभूमी–** नाशिकमध्ये दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. प्रयागराज येथील कुंभमेळ्यानंतर आता आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ मध्ये नाशिक येथे होणार आहे. रविवार दि. १ जून रोजी यासंदर्भातील एक महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे.



या बैठकीचे अध्यक्षस्थान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भूषवतील. या वेळी तेरा आखाड्यांचे प्रमुख साधू-संत, राज्य सरकारमधील महत्त्वाचे मंत्री, तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या बैठकीत नाशिकमधील शाहीस्नानाच्या तारखा अधिकृतपणे जाहीर होणार आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा भरणार असून त्र्यंबकेश्वर येथील तारखा यापूर्वीच जाहीर झाल्या आहेत.

परंतु अद्याप नाशिकच्या तारखा जाहीर करण्यात आलेल्या नव्हत्या, त्यामुळे साधू-महंतांमध्ये नाराजी होती. हीच नाराजी दूर करण्यासाठी रविवारी बैठक होत आहे. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात दुपारी १२ ते २ या वेळेत बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री फडणवीसांसह मंत्री छगन भुजबळ, दादा भुसे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ आणि कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांचीही उपस्थिती असणार आहे.

## SPOT NEWS

### चास येथील आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेशासाठी सुविधा केंद्र सुरू

**नगर । वीरभूमी –**

आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रास महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मान्यता मिळालेली आहे. यंदाच्या प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशासाठी २० मे २०२५ पासून ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे याची माहिती संस्थेचे संस्थापक मा. प्रा. अनिरुद्ध आडसूळ यांनी दिली. विद्यार्थ्यांनी २० मे २०२५ ते १६ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी. तसेच कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी असे आवाहन प्राचार्य आर. एस. गडाख यांनी केले आहे. सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ तंत्रनिकेतनमधील अद्ययावत संगणकीय साधन सामाग्री, इंटरनेट सुविधा, प्रशिक्षित व योग्य सुसंवाद साधणारा प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांची सुसज्ज बैठक व्यवस्था या सर्व सुविधा लक्षात घेऊन तंत्रशिक्षण विभागाने हे सुविधा केंद्र सुरू करण्यास परवानगी दिली आहे. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात येणार्या अंतर्गत गुण मूल्यमापनाचा आधारे प्रवेश देण्यात येणार आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्याने ऑनलाईन पद्धतीने १६ जूनपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य असेल. पॉलिटेक्निक प्रवेशासाठी कुठल्याही प्रकारची सी.ई.टी. परीक्षा नसेल इच्छुकांनी सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ तंत्रनिकेतन चास अहमदनगर येथे संपर्क साधावा. प्रवेशाकरिता सुविधा केंद्रामार्फत आवश्यक असणारे कागदपत्रे व इतर माहितीसाठीचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येईल. अडसूळ पॉलिटेक्निक विद्यालयामध्ये यंत्र अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इत्यादी शाखा २०१० पासून उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ९८५०२३५५५३ वर संपर्क साधावा.

### मतिमंद मुलीवर अत्याचार; आरोपीस अटक

**शेवगाव । वीरभूमी –**


लग्नाचे आमिष दाखवून ३१ वर्षीय मतिमंद मुलीवर अत्याचार करण्याचा प्रकार शेवगाव शहरामध्ये घडला. या प्रकरणी मुलीच्या बहिणीने दिलेल्या फिर्यादीवरून भाकपचे राज्य कौन्सिल सदस्य संजय भगवान नांगरे (वय ३९) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. शेवगाव पोलिसांनी फरार झालेल्या नांगरे यास मुंबई येथे अटक केली. न्यायालयासमोर हजर केले असता त्यास तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. आरोपी नांगरे याने ३१ वर्षीय मुलगी शारीरिक व मानसिक विकलांग असल्याचा फायदा घेत लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केले. कोणाला काही सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पीडितेच्या बहिणीने संजय नांगरे याच्या विरोधात शेवगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर पीडितेची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर तिच्यावर अत्याचार झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर आरोपीविरोधात वाढीव कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर नांगरे फरार झाला होता. शेवगाव पोलिसांनी त्यास २५ मे रोजी दादर (मुंबई) पोलिस ठाणे हद्दीतून ताब्यात घेतले. पुढील तपास उपविभागीय अधिकारी सुनील पाटील करीत आहेत. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतर संजय नांगरे याची पक्षातून हकालपट्टी केल्याचे भाकपचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांनी पत्रकाव्दारे जाहीर केले आहे.

# येत्या तीन वर्षात श्रीक्षेत्र चौंडी एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन आणि तीर्थक्षेत्र म्हणून नावरुपास येईल

**सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडून निर्णयाचे स्वागत । विकास आराखड्यातील कामे ३१ मे, २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार**

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३१ मे रोजीच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा न्यायप्रिय राज्यकारभार, प्रजाहितदक्षता, आक्रमकांनी उध्वस्त केलेल्या मंदिरांचे त्यांनी केलेले पुन:निर्माण आणि १८ व्या शतकातील त्यांचे सांस्कृतिक पुनरुत्थानाचे कार्य आपल्याला चिरस्फुर्तीदायी आहे. चौंडी येथील विकास आराखड्यासाठी ६८१ कोटींच्या खर्चास मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री श्री.अजित पवार यांच्या नियोजन विभागाने प्रशासकीय मान्यता दिल्याने येत्या तीन वर्षात कामे पूर्ण होऊन श्रीक्षेत्र चौंडी एक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन आणि तीर्थक्षेत्र म्हणून नावरुपास येईल, असा विश्वास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र सरकारची मंत्रीपरिषद बैठक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ०६ मे, २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जन्मगावी म्हणजे श्रीक्षेत्र चौंडी जि.अहिल्यानगर येथे पार पडली. मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीमंडळाने घेतलेले श्रीक्षेत्र चौंडी येथील स्मृतीस्थळ विकास आराखडा संदर्भातील महत्वपूर्ण निर्णय दिनांक ०६ मे, २०२५ रोजी घोषित केले. राज्य मंत्रीमंडळाने या बैठकीत राज्यातील मंदिरांचा जीर्णोध्दार करण्यासाठी ५५०० कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली.

उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजितदादा पवार यांनी चौंडी येथील विकास आराखड्यासाठी ६८१ कोटींच्या खर्चास नियोजन विभागाने प्रशासकीय मान्यता दिल्याचे जाहिर केले आहे. यामुळे श्रीक्षेत्र चौंडी एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन आणि तीर्थक्षेत्र म्हणून नावारुपास येईल. श्रीक्षेत्र चौंडीचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता पुरातत्वीय जाण असलेल्या व्यक्ती आणि संस्थांकडूनच विकास आराखड्यातील कामे ३१ मे, २०२८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अहिल्यानगर येथे उभारण्यात येत असलेले वैद्यकीय महाविद्यालय तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील सभागृह इमारत उभारणी यास देखील प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. फडणवीस सरकारने घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयांबद्दल सर्व संबंधितांचे श्रीक्षेत्र चौंडीचे भूमिपुत्र आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे मातृकुलाकडून नऊवे वंशज महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी अभिनंदन करुन आभार मानले आहेत.

### शवसमर्थ प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय शैक्षणिक सेवा गौरव पुरस्कार जाहीर

**नगर । वीरभूमी –**

शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणार्या शाळा, संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर बंधू भगिनींना पुणे येथील शिवसमर्थ प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय शैक्षणिक सेवा गौरव पुरस्काराची घोषणा संस्थापक अध्यक्ष शिवाजी खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसमर्थ प्रतिष्ठानच्या प्रमुख पदाधिकारी यांच्या कमिटीने हे पुरस्कार जाहीर केले आहेत.

शिवसमर्थ प्रतिष्ठान हे प्रतिवर्षी शैक्षणिक क्षेत्रातील शाळा, संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनींचा शैक्षणिक सेवा गौरव पुरस्कार देवून सन्मान करण्यात येतो तसेच प्रतिष्ठिनचे वतीने दरवर्षी समाजातील गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शैक्षणिक उन्नतीसाठी देणगीदारांच्या मदतीने गुणवत्ता शिष्यवृत्ती वाटप करण्यात येते. यावर्षीचे राज्यस्तरीय शैक्षणिक सेवा गौरव पुरस्कार उत्कृष्ठ शाळांमध्ये श्री अंबिका विद्यालय (केडगाव, अहिल्यानगर), ल.रा.आपटे प्रशाला (पुणे), शिवणे माध्यमिक विद्यालय (सोलापूर), श्री मुधाईदेवी विद्या मंदिर (देऊर, सातारा), कै. दादासाहेब पाटणकर हायस्कूल (म्हावेशी, सातारा), लक्ष्मणराव किर्लेसकर विद्याल (पलूस, सांगली) यांना जाहिर झाला आहे. तसेच विलास खाडे (पुणे), मीना साळुंके (पुणे), अशोक बाणे (पुणे), राजेंद्र तावरे (पुणे), संदिप शिंदे (सातारा), संतोष नाईक (सांगली), शैलेश गोंधळे (सांगली), शैलजा झपके (सोलापूर), महादेवी कोळी (सोलापूर), विजयकुमार माने (सोलापूर), परशराम पोवार (कोल्हापूर), नितिन नेसरीकर (कोल्हापूर), पद्माकर गोसावी (अहिल्यानगर), किशोर मुथ्था (अहिल्यानगर), देविदास पंडागळे (मुंबई), माणिक जाधव (सातारा), अनिता डेरे (सातारा) यांना शैक्षणिक सेवा गौरव पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

राज्यस्तरीय शैक्षणिक सेवा गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रम रविवार दि. ०१ जून २०२५ रोजी निळू फुले सभागृह, साने गुरुजी स्मारक, सिंहगड रोड, पुणे येथे जाहीर कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहेत.

### आ. आशुतोष काळेंची राज्याच्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी निवड

**कोपरगाव । वीरभूमी–**

राज्याचे सुधारित युवा धोरण ठरविण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या राज्याच्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी आ. आशुतोष काळे यांची निवड करण्यात आली आहे.

महायुती शासनाने बुधवार (दि.२८) रोजी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. दत्तात्रय मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली युवा धोरण समिती स्थापन केली आहे. यामध्ये उच्च शिक्षित, युवा नेतृत्व व राज्यात आपल्या विकास कामांच्या कामगिरीच्या जोरावर सर्वाधिक मताधिक्यात क्रमांक पाच ने निवडून आलेल्या आ. आशुतोष काळे यांना स्थान देण्यात आले आहे.काही महिन्यापूर्वीच आ. आशुतोष काळे यांची महाराष्ट्र विधिमंडळाच्या 'मराठी भाषा समितीच्या' अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा एकदा राज्याच्या अत्यंत महत्वाच्या असलेल्या युवा धोरण समितीच्या



सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

आपल्या निवडीबद्दल प्रतिक्रिया देतांना आ.आशुतोष काळे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरण समितीवर सदस्य म्हणून निवड झाल्याचा मला अत्यंत आनंद व अभिमान वाटतो. ही निवड म्हणजे केवळ एक पद नाही, तर राज्यातील लाखो तरुणांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करण्याची मोठी जबाबदारी आहे. आजचा युवक हा केवळ देशाचे भविष्य नाही, तर वर्तमानातील शक्ती आहे. युवकांच्या शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास, मानसिक आरोग्य आणि नेतृत्वगुणांच्या विकासासाठी ठोस पावले उचलणं ही आमची प्राथमिकता राहील व या धोरणाद्वारे युवकांसाठी नवे दरवाजे खुले होवून त्यांच्या उर्जेला योग्य दिशा मिळेल. शहरात असो की ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक तरुणाला समान संधी मिळाली पाहिजे. 'स्वप्न पाहणारा' युवक, 'स्वप्न साकार करणारा' झाला पाहिजे हाच आमचा हेतू आहे. त्यासाठी शासन, शिक्षणसंस्था, उद्योगजगत आणि स्वयंसेवी संस्था यांचं सशक्त समन्वय साधण्याचा प्रयत्न राहील.युवकांसाठीचे धोरण त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणारे ठरावे, यासाठी मी सदैव कटिबद्ध राहील अशी ग्वाही आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे. आपल्या निवडीबद्दल राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. दत्तात्रय मामा भरणे यांचे आ. आशुतोष काळे यांनी आभार मानले आहे.

# न्यू निस्सान मॅग्नाइट आता सीएनजी रिट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध

**सीएनजी रिट्रोफिटमेंट किट ७४९९९ रूपये अतिरिक्त किंमतीत उपलब्ध होणार**

**सीएनजी पर्यायामुळे पारंपरिक इंधनांना अधिक स्वच्छ आणि पर्यावरणस्नेही पर्याय उपलब्ध, अधिक इंधन कार्यक्षमता**

**सीएजी पर्याय एक मानक रिट्रोफिटमेंटसह असणार; त्यात ३ वर्षे किंवा १ लाख किमीची वॉरंटी असेल**




**मुंबई । प्रतिनिधी–**

निस्सान मोटर इंडियाची लोकप्रिय एसयूव्ही न्यू निस्सान मॅग्नाइट आता सरकार-मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध असेल. सीएनजी किट देशाच्या नियामक मानकांनुसार मोटोझेन (तृतीय पक्ष) द्वारे पूर्णपणे विकसित, उत्पादित आणि गुणवत्ता हमीसह असेल. मोटोझेन किटमधील घटकांसाठी वॉरंटी देईल. या उपक्रमातून ग्राहक-केंद्रित उपाययोजना प्रदान करण्यावर भर दिला जाईल. या किट्सचे फिटिंग सरकारी मान्यताप्राप्त फिटमेंट केंद्रांवर केले जाईल. संपूर्ण रेट्रोफिटमेंट फक्त ७४,९९९ रुपयांच्या स्पर्धात्मक अतिरिक्त किमतीत उपलब्ध असेल.

शाश्वततेबद्दल आणि पर्यावरणाविषयी जागरूक ग्राहकांसाठी या पर्यावरणपूरक सीएनजी किट फिटमेंटची अंमलबजावणी देशभरात टप्प्याटप्प्याने केली जाईल. पहिल्या टप्प्यात निस्सानचे ग्राहक दिल्ली-एनसीआर, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, केरळ आणि कर्नाटक या ७ राज्यांमधील निस्सान अधिकृत डीलरशिपद्वारे सीएनजी किट बसवून घेऊ शकतात. दुसऱ्या टप्प्याचा भाग म्हणून नंतर ते देशभरातील इतर राज्यांमध्ये विस्तारित केले जाईल.

सीएनजी किट पर्याय फक्त मॅन्युअल गिअरबॉक्स असलेल्या नवीन निस्सान मॅग्नाइट १.० लिटर नॅचरली एस्पिरेटेड पेट्रोल इंजिनसाठी उपलब्ध आहे. सीएनजी रेट्रोफिटेड किटमुळे ग्राहकांना इंधन बचतीचा फायदा होईल. सर्व सीएनजी किट्स सरकारी मान्यताप्राप्त विक्रेत्यांकडून रेट्रोफिट केले जातील. त्यात ग्राहकांना सध्याच्या स्थानिक नियमांचे आणि सुरक्षा मानकांचे पालन करणारे प्रमाणित होमोलोगेटेड किट दिले जाईल.

निस्सान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ वत्स म्हणाले:न्यू निस्सान मॅग्नाइट हे आमच्यासाठी एक अभूतपूर्व उत्पादन आहे आणि त्याने भारतात आमच्या यशाचे नेतृत्व केले आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निस्सान डीलर्स सरकार-मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटच्या स्वरूपात पर्यायी इंधन पर्याय देतील. ते ग्राहकांसाठी अधिकृत फिटमेंट केंद्रांवर फिट केले जाईल. आम्हाला खात्री आहे की यामुळे लोकप्रिय कॉम्पॅक्ट एसयूव्हीचे मूल्य आणि व्यावहारिकता वाढेल.न्यू मॅग्नाइट एसयूव्हीची बोल्ड आणि स्टायलिश डिझाइन, २०+ पहिली आणि सर्वोत्तम श्रेणीतील वैशिष्ट्ये आणि ५५+ सुरक्षा वैशिष्ट्ये यामुळे ती कॉम्पॅक्ट एसयूव्ही सेगमेंटमध्ये एक वेगळी निवड ठरते. रस्त्यांवरील ठळक उपस्थिती, प्रीमियम वैशिष्ट्ये आणि वाढत्या जागतिक व्याप्तीसह न्यू निस्सान मॅग्नाइट आता ६५ हून अधिक उजव्या हाताने ड्राइव्ह आणि डाव्या हाताने ड्राइव्ह अशा दोन्ही बाजारपेठा असलेल्या देशांमध्ये उपलब्ध आहे.

**अधिक माहितीसाठी कृपया येथे भेट द्या : www.nissan.in.**

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## स्वस्तिक बसस्थानक व जुन्या आरटीओ कार्यालय परिसरातील अतिक्रमणे काढली

**अहिल्यानगर । प्रतिनिधी–**

नगर शहरातील स्वस्तिक बसस्थानक परिसरातील अतिक्रमणांवर आज, गुरुवारी महापालिकेने हातोडा चालविला. या मोहिमेत स्वस्तिक चौक व स्वस्तिक बसस्थानक परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. नगर-पुणे रस्त्यावरील स्वस्तिक चौक तसेच स्वस्तिक बसस्थानक परिसराला अतिक्रमणांचा विळखा पडला होता. या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून आज ही कारवाई करण्यात आली. त्यात स्वस्तिक बसस्थानकाच्या लगत असलेले अतिक्रमण, लक्झरी बसस्टॉप, मटका शेड टपऱ्या हटविण्यात आल्या. बसस्थानक परिसरातील वडापाव हातगाडी, मावा टपरी तसेच स्टेशनरीच्या चार ते पाच टपऱ्या, हातगाड्या हटवण्यात आल्या तर वडापावच्या दोन टप-या व मावा टपरी जप्त करण्यात आली. मटक्याचे शेड तोडण्यात आले. तलाठी कार्यालय, बसस्थानकाच्या आतील मोकळ्या जागेत थाटलेल्या अंडा-आम्लेट, चहानाश्ता इतर टपऱ्या जीसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आल्या. प्रभाग समिती दोनचे क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे व कोतवालीचे पोलीस निरीक्षक दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्तात महापालिकेने ही कारवाई केली. तसेच शहरातील जुन्या आरटीओ कार्यालयासमोर महानगरपालिकेच्या जागेत करण्यात आलेले पक्के अतिक्रमण अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकाने कारवाई करून हटवले. तेथील पत्र्याच्या शेड, ऑफीस केबिन जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करून जागेला कंपाऊंड करून जागा ताब्यात घेण्यात आली. पोलिस अधीक्षक कार्यालय चौकालगत असलेल्या महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीशेजारी असलेल्या जागेत अतिक्रमण करून वाहन खरेदी विक्रीचा व्यवसाय थाटण्यात आला होता. तेथील अतिक्रमण महानगरपालिकेने यापूर्वी कारवाई करून काढले होते. शहरातील महानगरपालिकांच्या जागांवरील अतिक्रमणांचा आढावा घेतला जात आहे. टप्प्याटप्प्याने या जागांवरील अतिक्रमणे कारवाई करून हटवण्यात येणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

## कोठी परिसरातील अवैध गॅस रिफिलींग सेंटरवर छापा; २८ हजाराचा मुद्देमाल जप्त

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

कोतवाली पोलिसांनी कोठी परिसरातील अवैध गॅस रिफिलींग सेंटरवर छापा टाकून कारवाई केली. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २८ रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास शहरातील नेवासकर पेट्रोल पंपाच्या शेजारी खालकर हॉस्पीटलसमोरील मोकळ्या मैदानात पत्र्याच्या शेडमध्ये आकाश कैलास साळवे (रा. कोठी, स्टेशन रोड) हा घरगुती गॅसटाकीतून लोकांच्या जीवितास निर्माण होईल अशा पद्धतीने वाहनांमध्ये मशीनच्या साह्याने गॅस रिफिलींग करताना मिळून आला. त्याच्या ताब्यातून गॅसटाक्या, मशीन असा एकूण २७ हजार ९७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पुरवठा निरीक्षक संतोष किसनराव घोलप यांच्या फिर्यादीवरून आकाश साळवे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८७, २८८, १२५ सह अत्यावश्यक वस्तू कायदा १९९५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोसई शीतल मुगडे करीत आहेत.

### माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून

# शहीद जवान संदीप गायकर यांच्या कुटुंबियांचे सांत्वन

**अकोले । वीरभूमी–**

जम्मू काश्मीर मध्ये दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण आलेले अकोले तालुक्याचे सुपुत्र शहीद जवान संदीप पांडुरंग गायकर यांच्या कुटुंबीयांचे आज महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांत्वन केले आहे याचबरोबर या सुपुत्राचा संपूर्ण महाराष्ट्राला सदैव अभिमान राहील असे अभिवादन केले आहे.

ब्राह्मणवाडा येथे शहीद संदीप गायकर यांच्या कुटुंबीयांची मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भेट घेतली याप्रसंगी वीर पत्नी रूपाली गायकर, वीर जवान संदीप यांचे वडील पांडुरंग गायकर याचबरोबर विक्रम नवले, सुरेश गडाख, ॲड. आर. बी. हांडे, शिवाजी नेहे, सुभाष गायकर, भारत आरोटे, संदीप वाघमारे, रजनीकांत भांगरे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.



जम्मू काश्मीर मधील तिसवाड सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी लढताना १५ मराठा बटालियन मध्ये कार्यरत असलेले अकोले तालुक्याचे सुपुत्र संदीप जवान यांना हुतात्म प्राप्त झाले. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठी शोककळा पसरली. हे वृत्त समजतात मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी शोक व्यक्त करत देशाच्या सीमांचे रक्षण करण्याकरता आपल्या सुपुत्राने बलिदान दिले असल्याने त्याची बलिदान हे व्यर्थ जाणार नसून या त्यांच्या बलिदानाचा संपूर्ण जिल्ह्याला अभिमान राहील असे गौरवोद्गार काढले होते.

आज माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. याचबरोबर या सुपुत्राने देशासाठी बलिदान दिले असून अहिल्यानगर जिल्हा , संगमनेर तालुका व अकोले तालुका हा सदैव या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहील असे सांगताना वीर जवान संदीप याचा आपल्याला सदैव अभिमान राहील अशी भावना व्यक्त केली.

यावेळी गावातील पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. पाऊलबुधे विद्यालयात दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नगर । प्रतिनिधी–**

दहावीच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर काही विद्यार्थ्यांना आनंद झाला तर काहींच्या पदरी निराशा प्राप्त झाली.अशी परिस्थिती असली तरी विद्यार्थ्यांच्या स्वप्नाला आभाळ ठेंगणे वाटते, तर अपयशाच्या सीमेवर पुन्हा पुरवणी परीक्षा देऊन स्वतः च्या जीवनाचा मार्ग नव्याने शोधण्याच्या तयारीत विद्यार्थी असतात. दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील एक महत्त्वाचा वळणबिंदू असतो. असे प्रतिपादन सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव रामकिसन देशमुख यांनी केले.

वसंत टेकडी येथील डॉ. ना. ज. पाऊलबुधे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० वी, १२ वी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार प्रा. दादासाहेब भोईटे, संकुल प्रमुख प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराणा, प्राचार्या विजया नवले, सुनिता त्रिंबके, वैशाली शिर्के, माजी शिक्षक राजेंद्र मोरे, प्रा.रंगनाथ वाघ, प्रा. रोहिदास चौरे, लक्ष्मण बेळगे अंबादास शिंदे, विनायक सापा, घनश्याम सानप, विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. श्री. देशमुख म्हणाले अकरावी प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. या टप्प्यावरच विद्यार्थ्यांचे पुढचे शिक्षण, करियर आणि व्यावसायिक आयुष्याची दिशा ठरते. त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या कला, गुणा चे आवडीनुसार पुढील शिक्षणाची निवड करताना चा निर्णय विचारपूर्वक घ्यावा, असे आवाहन केले.

प्रा.दादासाहेब भोईटे म्हणाले पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे निरीक्षण करावे, त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधावा, त्यांची आवड निवड लक्षात घेऊनच उज्वल भविष्याची दिशा ठरवावी, मुलांच्या बुद्धिमत्तेचा विचार त्यांच्या कलाचा आदर करावा. त्यांना केवळ जीव घेण्या स्पर्धेत न ढकलता आनंदाने शिकण्याचा, शिकताशिकता, जगण्याचा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न पालकांनी करावा.

## नगर-मनमाड महामार्ग पुणतांबा चौफुली परिसरात दुरुस्ती करा अन्यथा आंदोलन : वैभव आढाव

**कोपरगाव । वीरभूमी–**

शहरालगत असलेल्या पुणतांबा चौफुलीजवळील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे निर्माण झाले आहेत. या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांचे जिवित धोक्यात आले आहे. नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका महिलेस आपला प्राण गमवावा लागल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष वैभव आढाव यांच्या वतीने संबंधित विभागाकडे तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

एकीकडे मतदारसंघाच्या विकासाचा भ्रमनिरास दिवसेंदिवस लोकप्रतिनिधी करत आहेत. कोट्यवधीच्या वल्गना झाल्या पण दुर्दैवाने कामे अतिशय निकृष्ट असल्याचा प्रकार समोर येतो आहे. या अपघातांचे दायित्व लोकप्रतिनिधींनी घ्यावे कारण



त्यांच्या उदासीन धोरणामुळे सदर दुर्दैवी वेळ मतदारसंघाच्या नागरिकांना भोगावी लागते आहे याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे.

या स्थितीमुळे कोपरगाव भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांनी मा. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांना पत्रव्यवहार केला आहे. या निवेदनात पुणतांबा चौफुली परिसरातील रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे वाहनांची वाहतूक अडथळाग्रस्त होत असून, अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सदर रस्ता हा नगर मनमाड महामार्गाचा भाग असल्याने, त्याच्या देखभालीची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची आहे. मात्र, दीर्घकाळापासून या मार्गावरील दुरुस्तीचे काम पूर्णत्वास गेले नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. अपघातांमुळे जनतेत भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यातच पावसामुळे अधिक प्रमाणात अनेक वेळा दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांना या खड्ड्यांमुळे धोका निर्माण झाला आहे.

तरी, रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवून साईडपट्टीसह वाहतुकीसाठी सुरक्षित व्यवस्था करण्यात यावी आणि या संपूर्ण परिस्थितीची योग्य चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून उत्तरदायित्व निश्चित करण्यात यावे अशी मागणी आढाव यांनी केली आहे. जर दहा दिवसांत कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही तर, भारतीय जनता पार्टी कोपरगाव शहराच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# स्वयंशिस्त, आत्मविश्वासाने आयुष्य घडते

### बिपीनदादा कोल्हे । संजीवनी युवा प्रतिष्ठानचा रोजगार महोत्सव उत्साहात

**कोपरगाव । वीरभूमी–**

आजच्या पिढीची युवाशक्ती हुशार आणि तंत्रज्ञानाने युक्त आहे, कुठल्याही क्षेत्रातील नोकरी मिळवितांना स्वयंशिस्त, आत्मविश्वास आणि ध्येयाच्या जोरावर युवक सामोरे गेल्यास त्यात निश्चित यश मिळते असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले. युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या संकल्पनेतून संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित रोजगार मेळावा उत्साहात पार पडला असून शेकडो युवकांना एम.एन.सी कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी या माध्यमातून मिळाली आहे.

संजीवनी युवा प्रतिष्ठानच्यावतीने कारखाना कार्यस्थळावर बुधवारी नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यांत आले होते त्याचे उदघाटन क्रेडाईचे अध्यक्ष उद्योजक राजेश ठोळे यांच्या हस्ते करण्यांत आले त्याप्रसंगी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पुजनही यावेळी करण्यांत आले. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांच्या संकल्पनेतुन नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यांत आले असुन त्याचे हे दुसरे वर्ष असल्याचे अमृत संजीवनी शुगरकेन संस्थेचे अध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले. मानव संसाधन



विकास अधिकारी विशाल वाजपेयी यांनी युवकांना मुलाखत तंत्र, स्वतः बददलची माहिती, मुलाखतीत काय माहिती द्यावी, कशाबददल बोलु नये, परिसरासह दैनंदिन सामान्यज्ञान, पेहराव कसा असावा, ज्या कंपनीसाठी मुलाखत द्यायची त्यांची माहिती इत्यादी छोटया छोटया गोष्टींची माहिती दिली. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, संजीवनी युवा प्रतिष्ठानचे सिध्दार्थ साठे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रतिष्ठान उपक्रमाची माहिती दिली.

श्री. राजेश ठोळे याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, कोपरगांव सारख्या ग्रामिण भागात सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी पुणे मुंबई आदी शहरातील मल्टीनॅशनल कंपन्यांचे प्रतिनिधींना बोलावून येथील सुशिक्षीत बेरोजगारांच्या हाताला काम कसे मिळेल हा विशाल दृष्टीकोन ठेवुन सलग दुसऱ्यावर्षी नोकरी महोत्सवाचे आयोजन केले, त्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

श्री. बिपीनदादा कोल्हे पुढे म्हणाले की, सुशिक्षीत बेरोजगारांनी आयुष्यात प्रत्येक स्पर्धेला सामोरे जातांना आत्मविश्वास बाळगला पाहिजे. आत्मसात केलेल्या ज्ञानाच्या जोरावर नोकरी मिळवितांना चिकाटी ठेवावी. आई वडील गुरूजन यांनी आपल्याला जे जे शिकवले त्याचा दैनंदिन व्यवहारात काम करतांना उपयोग करावा. ग्रामिण भागातील मुला मुलींमध्ये ध्येय आहे त्यामुळे शहरी भागातील मुलांशी स्पर्धा करतांना मनांत कधीही भिती बाळगू नये. रोजगार वाढीसाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धोरणात्मक निर्णय घेतले आहे. युवकांना उद्योजक होण्यासाठी स्टार्ट-अप्सच्या माध्यमांतुन चालना देण्यांचे मोठे काम केले आहे. नोकरी मिळाली नाही मागून कुणीही निराश होवु नये, प्रयत्न करीत रहा निश्चित त्याला यश येईल. मिळालेल्या संधीचे सोने करा, पुर्वी आपण प्रगत देशाच्या तंत्रज्ञानावर अवलंबुन होतो आता मात्र परिस्थिती बदलली आहे. भारत देश आणि त्यातील युवा शक्तीवर जगाचे लक्ष लागले आहे. येथील युवाशक्तीच्या हातात स्कील आहे. येथील सुशिक्षीत बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे या उद्देशाने ग्रामीण भागातील राज्यातील पहिले बीपीओ कॉल सेंटर संजीवनीने सुरू केले असेही ते शेवटी म्हणाले.

याप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते, प्रभारी कार्यकारी संचालक तथा साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे, विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, खाते प्रमुख, उपखातेप्रमुख, युवासेवक रोहित कनगरे, कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपा तालुकाध्यक्ष विशाल गोर्डे यांनी आभार मानले.

## शासनाच्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी आ. सत्यजित तांबे यांची निवड

**संगमनेर । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्याच्या नवीन युवा धोरणासंदर्भात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र राज्यात युवा धोरण, २०१२ च्या आधारे सुधारित युवा धोरण तयार करण्यासाठी एक नवीन समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ. सत्यजित तांबे यांचा समावेश करण्यात आला आहे.



या संदर्भातील शासन निर्णय २८ मे, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राज्याच्या युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सक्षम धोरणाची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण, २०१२' हे धोरण जाहीर केले होते. मात्र, १० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटल्याने, हे धोरण सध्याच्या गरजांनुसार अपुरे पडू लागले होते. त्यामुळे, राज्याच्या युवा धोरणामध्ये सुधारणा करून नवीन धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

नवीन धोरणाच्या निर्मितीसाठी आणि जुन्या धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे. या समितीमध्ये अनुभवी मंत्री, अधिकारी आणि तज्ञांचा समावेश असून समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांच्यावर सोपविण्यात आले असून समितीमधील अन्य सदस्यांमध्ये विधान परिषद सदस्य सत्यजित तांबे, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी यांच्यासह विधानसभा सदस्य संतोष दानवे, राजेश पवार, आशुतोष काळे यांच्यासह क्रीडा विभागाचे अपर सचिव, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचा १ प्रतिनिधी (उपसचिव/ संचालक/ आयुक्त/ सहसंचालक किंवा यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नवोपक्रम विभागाचे १ प्रतिनिधी (उपसचिव/ संचालक/ आयुक्त/ सहसंचालक किंवा यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी) यांचा समावेश करण्यात आला आहे.

या समितीला राज्याच्या युवकांचे भविष्य उज्ज्वल बनवण्यासाठी एक मजबूत आणि सर्वसमावेशक धोरण तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. हे नवीन धोरण युवकांना शिक्षण, रोजगार, क्रीडा, कौशल्य विकास आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देण्यास मदत करेल.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी गौरव महोत्सवाला प्रारंभ

## माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील आणि आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून भव्य शोभायात्रेचा शुभारंभ

**● अहिल्यानगर | वीरभूमी –** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त जनसेवा फाउंडेशन व विचार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहिल्यानगर गौरव दिन महोत्सवाचा शुभारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि पारंपरिक वातावरणात करण्यात आला.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेची सुरुवात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, ही शोभायात्रा दिल्लीगेट–बालिकाश्रम रोड येथून प्रारंभ होऊन प्रोफेसर चौक येथे संपन्न झाली. हजारोंच्या संख्येने जमलेल्या नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागाने ही मिरवणूक एका ऐतिहासिक सोहळ्यात रूपांतरीत झाली. पारंपरिक वेशभूषा, ढोल–ताशा पथकं, विविध धर्म–जातीतील महापुरुषांच्या मूर्ती, देवदेवतांचे रथ आणि जिल्ह्यातील पारंपरिक नृत्यप्रकारांनी संपूर्ण परिसर उत्सवमय झाला होता.

हा गौरव महोत्सव तीन दिवस चालणार आहे. दुसऱ्या दिवशी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार असून, तिसऱ्या दिवशी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित एक प्रसिद्ध नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. त्याद्वारे महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

डॉ. विखे पाटील यांनी अभिमानाने नमूद केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनातून हा महोत्सव अहिल्यानगरमध्ये भव्य स्वरूपात साकारण्यात आला असून, संपूर्ण महाराष्ट्रभर तो साजरा होत आहे, ही अत्यंत गौरवास्पद गोष्ट आहे.

या भव्य सोहळ्याला माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, स्वागताध्यक्षा धनश्री विखे पाटील, विचार भारतीचे अध्यक्ष राजाभाऊ मुळे, भाजपाचे नगरसेवक, पदाधिकारी आणि हजारो नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक आणि नागरिकांचे डॉ. सुजय विखे पाटील यांनी मन:पूर्वक आभार मानले. यानंतर त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पुतळ्यास पुष्पार्पण करून सर्व उपस्थितांना त्रिशताब्दी जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.



## खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी किमान इन्वोसिव्हत लेझर सर्जरीचा वापर करत ७ वर्षीय मुलाच्या मूत्रमार्गामधील खडे काढून टाकले

**● पुणे | प्रतिनिधी–** पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी ७ वर्षीय मुलावर यशस्वी उपचार केले. ज्याला वारंवार मूत्रमार्गाच्या संसर्गाचा (यूटीआय) त्रास होत होता. जसे लघवी करताना जळजळ होणे आणि अनेक महिने पोटदुखी. गेल्यावर्षी या मुलाने अनेक हॉस्पिटल्स्‌मध्ये उपचार केला आणि त्याला तात्पुरता आराम मिळाला. रुग्णाला खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले आणि डॉक्टरांना आढळून आले की त्याच्या मूत्रमार्गात मोठे खडे आहेत.

बाहेरून केलेल्या अल्ट्रासाऊंडमध्ये डावीकडील खालच्या मूत्रमार्गात १२ मिमीचा खडा आढळून आला आणि ओपन सर्जरी करण्याचा सल्ला देण्यात आला. खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील युरोलॉजी सल्लागार डॉ. अंकित शर्मा यांच्या नेतृत्वाखालील टीमने केलेल्या सीटी क्यूबी स्कॅनमध्ये हे दुर्मिळ निदान झाले. मूत्रवाहिनी आणि मूत्रमार्ग दोन्हीमध्ये मोठ्या कॅल्क्युली मोठ्या कॅल्क्युली म्हणजे १० मिमी पेक्षा जास्त आकाराचे मूत्रमार्गातील खडे, जे लघवीचा प्रवाह रोखू शकतात आणि त्वरित उपचार




न केल्यास मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतात) असल्याचे दिसून आले. बाल वयोगटातील ही असामान्य घटना आहे. मुलाला यापूर्वी मूत्रमार्गातील खडे काढण्यासाठी ओपन सर्जरीचा सल्ला देण्यात आला होता. पण, टीमने सुरक्षित आणि किमान इन्वेमसिव्हा पद्धतीचा अवलंब केला. मुलावर युरेटेरोस्कोपिक ॲलिथोट्रिप्सी किंवा लेझर यूआरएसएल प्रक्रिया करण्यात आली. ही अत्याधुनिक एंडोस्कोपिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये बाहेरून चीर न करता खडे विरघळवण्यासाठी आणि काढून टाकण्यासाठी लेझर रेडिएशन वापरले जाते. यशस्वी शस्त्रक्रियेच्या एक दिवसानंतर रुग्णाला डिस्चार्ज देण्याात आला.

याबाबत मत व्यक्त करत खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील न्युरोलॉजी सल्लागार डॉ. अंकित शर्मा म्हणाले, मुलांमध्ये वारंवार होणाऱ्या मूत्रमार्गाच्या संसर्गाकडे किंवा वर्तणूकीमध्ये बदल दिसून आल्यास त्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये. आमच्या ट्विन स्टोमन समस्यास निदर्शनास आली, पण लक्षणे अस्पष्टपणे दिसून येत होती. आम्ही या स्थितीचे वेळेत निदान करू शकलो आणि ओपन सर्जरी टाळून किमान इन्वसिव्हव प्रक्रियेने त्यावर उपचार करू शकलो. मुलांमध्ये, या दोन्ही बाबी अत्यंत असामान्य आहेत. लघवी करताना त्रास होणे आणि वारंवार होणाऱ्या मूत्रमार्गाच्या संसर्गाकडे कधीही दुर्लक्ष करू नये, विशेषतः जर ते वारंवार होत असतील. या सामान्यतः वर्तणूकीशी संबंधित समस्या नसतात आणि बहुतेकदा वैद्यकीय उपचाराची आवश्यकता असलेल्या न्युरोलॉजिकल पॅथॉलॉजीची लक्षणे असू शकतात.

पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलचे संचालक डॉ. परमेश्वर दास म्हणाले, विशेषत: लहान मुलांमधील लक्षणे कमी असण्यासोबत स्पष्टपणे ओळखता येऊ शकत नसल्यामुळे लवकर निदान महत्त्वाचे आहे. खराडीमधील मणिपाल हॉस्पिटलमध्ये आमचा रूग्णांना अत्याधुनिक, किमान इन्वोसिव्हे उपचार देण्यासचा मनसुबा आहे, जेथे त्यांसची सुरक्षितता, जलद रिकव्हरी आणि दैनंदिन जीवनात कमीत–कमी हस्तहक्षेपाला प्राधान्य दिले जाते. सर्वात गुंतागुंतीच्या समस्यांना देखील कौशल्य व सहानुभूतीसह हाताळले जाते, जेथे आम्हीा बहुआयामी दृष्टिकोनाचा अवलंब करतो.

त्वरित कृती, कुशलपणे करण्याचत आलेली वैद्यकीय मदत आणि अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञानाच्या वापरामुळे हा लहान मुलगा आता पूर्णपणे बरा झाला आहे आणि कोणतीही वेदना किंवा त्रासाशिवाय दैनंदिन जीवन जगत आहे. पालकांनी विशेषत: मुलांमधील लघवीसंदर्भात लक्षणांकडे सतत लक्ष दिले पाहिजे. लवकर निदान व उपचार दीर्घकालीन परिणामांना प्रतिबंध करू शकतात आणि आरोग्यीदायी, सक्रिय बालपणाची खात्री देऊ शकतात.

## कोपरगाव सावळीविहीर रस्त्याच्या कामाचे योग्य नियोजन करून कामाला गती द्या

### अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव | वीरभूमी–** कोपरगाव शहराच्या जवळून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी या महामार्गाचे काम रखडले आहे. शिवाय सबंधित ठेकेदार कोणत्याही प्रकारचे नियोजन करता अत्यंत धीम्या गतीने काम करीत आहे. त्यामुळे वाहतुकीला येत असलेला अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी सुरु असलेले सावळी विहीर फाटा ते कोपरगाव रस्त्याचे काम योग्य नियोजन करून कामाला गती द्या. अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचा ईशारा आ.आशुतोष काळे यांनी दिला आहे.

राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी या महामार्गावरील कोपरगाव सावळीविहीर रस्त्याचे कामासाठी आ.आशुतोष काळे यांनी १९१ कोटी निधी मंजूर करून आणला आहे. परंतु या महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून आजतागायत या महामार्गाचे काम संबंधित ठेकेदार अत्यंत संथ गतीने करीत असल्यामुळे सदर कामाची मुदत संपली असतांना देखील या महामार्गाचे काम पूर्ण होवू शकले



नाही. तसेच काम करीत असतांना नियोजनाचा अभाव असल्यामुळे या महामार्गावर रहदारीला येणाऱ्या अडथळ्यामुळे अपघाताचे प्रमाण देखील वाढलेले असून नागरीकांना आपले प्राण गमवावे लागलेले आहे. त्यामुळे या रस्त्याने प्रवास करतांना नागरीकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

कोपरगाव मतदार संघात मागील काही दिवसांपासून सातत्याने पडत असलेला पाऊस व या महामार्गावर असलेले तिर्थक्षेत्र, महाविद्यालय, तसेच मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे होत असल्यामुळे रहदारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. संबंधित ठेकेदाराने योग्य नियोजन न करता सर्व्हिस रोड पूर्ण करण्यापूर्वीच उड्डाण पुलाचे काम हाती घेतल्यामुळे रहदारीच्या अडचणी अधिक प्रमाणात वाढल्या असून रहदारीस वारंवार अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी वेळोवेळी रहदारी थांबली जावून त्याचा फटका अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयात घेवून जाणाऱ्या रुग्णवाहिकांना देखील बसत असून त्यामुळे वेळप्रसंगी रुग्णांचा जिव जाण्याचा धोका देखील नाकारता येवू शकत नाही. या सर्व बाबी गंभीर असून अपघाताचे प्रमाण वाढून जीवित हानी देखील होत आहे.

परंतु याबाबत सबंधित ठेकेदार आणि अधिकारी देखील गंभीर नसून ठेकेदाराची कामाची मुदत संपलेली असतांना देखील अद्याप कामात सुधारणा झालेली नाही. त्यामुळे सुरु असलेले सावळी विहीर फाटा ते कोपरगाव रस्त्याचे काम योग्य नियोजन करून लवकरात लवकर पूर्ण करावे अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचा ईशारा आ.आशुतोष काळे यांनी दिला आहे.

# रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाने भाजपा संघटनेत गतिमानता

## कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच आहे : रविंद्र चव्हाण

**● मुंबई | वीरभूमी –** आमदार रविंद्र चव्हाण यांनी भाजपा कार्यकारी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कार्यशैलीने संघटनेत गतिमानता आणल्याचे दिसून येत आहे. डोंबिवलीसारख्या भाजपाच्या बालेकिल्ल्यातून आमदार म्हणून सलग चार वेळा निवडून येणाऱ्या रविंद्र चव्हाण यांनी भाजपाच्या उजव्या विचारसरणीचा झेंडा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याबरोबरच राज्यातील विविध पक्षांतील अनेक महत्त्वाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत आहेत. अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या अंगीकृत संस्था त्याचसोबत विविध समाज घटक यांना भाजपाच्या प्रवाहात आणण्याचा झपाटा रविंद्र चव्हाण यांनी लावला आहे.

मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. सदर कार्यक्रमात बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच आहे. अंत्योदयाचे दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी भाजपा परिवार सदैव कटिबद्ध आहे. यामुळे कामगार वर्गासमोर असणाऱ्या असंख्य छोट्या–मोठ्या प्रश्नांचं समाधान केवळ भाजपा विचारधारेतच आहे, हे कामगार वर्गाला भाजपाकडे आकृष्ट करण्यात यशस्वी ठरत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कामगार वर्गाने मोठ्या संख्येने आपल्या भाजपा परिवारात प्रवेश करत आहे. शिव वाहतूक सेना उबाठा गटाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. महेश सुधाकर पोरे, महाराष्ट्र उपाध्यक्ष संजय चावनेकर, रायगड जिल्हाध्यक्ष अच्युत पाटील, रायगड जिल्हा संघटक विनायक बेलोसकर, खारघर शहर अध्यक्ष मोहसिन शेख यांच्या सोबत मुंबई, नवी मुंबई, रायगड, धुळे, जळगाव, चंद्रपूर, बीड येथील शिव वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी आज विकासाचे ‘कमळ’ हाती घेतले आहे. तसेच इंडिगो एजाईल एअरपोर्ट प्रायव्हेट लि. मुंबई विमानतळ, बीडब्लूएफएस मुंबई विमानतळ, एयर इंडिया, स्पाईसजेट एअरलाईन अशा विविध वाहतूक कामगार संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी देखील भाजपाचा ध्वज हाती घेतला.




अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष पद ही अतिशय मोलाची जबाबदारी कामगार वर्गाने अत्यंत विश्वासाने माझ्यावर सोपवली आहे, त्यांच्या या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही! तुमच्या खांद्याला खांदा लावून तुमच्या सर्व मागण्या पूर्णत्वास नेईन असे प्रतिपादन चव्हाण यांनी केले आणि कामगार वर्गाच्या समस्या सोडवण्यासाठी कामगारांच्या खांद्याला खांदा लावून पाठपुरावा करेन, अशी ग्वाही यावेळी त्यांनी कामगार वर्गाला दिली. तसेच आदरणीय नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वातील केंद्र सरकार आणि आदरणीय देवेंद्रजींच्या नेतृत्वातील भाजपा–महायुती सरकार या एकविचारी सरकारच्या माध्यमातून कामगार वर्गाचे प्रश्न निश्चित पूर्णत्वास जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भाजपा महाराष्ट्र प्रदेश मुख्यालयाच्या प्रांगणात झालेल्या जाहीर सत्कार सोहळ्याला अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे कार्याध्यक्ष जितेंद्र राऊत, सरचिटणीस सुहास माटे, संयुक्त सरचिटणीस निशांत गायकवाड आणि योगेश आवळे, उपाध्यक्ष विनोद घोगळे व रेमन कोळी, खजिनदार हर्षित तस्कर यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कामगार वर्ग उपस्थित होते.